# उल्हासनगर महानगरपालिका, मालमत्ता कर विभाग

ULHASASNAGAR MUNICIPAL CORPORATION, PROPERTY TAX DEPT.

मुख्य कार्यालय, तळमजला, उल्हासनगर-४२१ ००३ जिल्हा ठाणे, महाराष्ट्र

Head Office, Ground Floor,Ulhasnagar-४२१ ००३ Dist Thane, Maharashtra

Tel No:- ९५२५१-२७२०११६ /१२५ Ext. No. २३८ Fax No:- ९५२५१-२७२०१०४


जा.क्र./उमपा/करवि./यु.२/३४३/२३

दि. १२/०३/२०२४

**विषय -** उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. ११बीआय०१५१६६३०० (११/००८४५) या मालमत्तेवर **श्री. मनोज दयालदास गोपलानी** अन्वये करण्यात आलेली नोंद बाबत.

## प्रस्तावना

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियक १९४९ चे अनुसूचितील प्रकरण ८ मधील नियम २० अन्वये उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील इमारती व जमिनी यावरील कर निर्धारणा विरूध्द् संबंधीत व्यक्तीत अभिवेदन केल्यावर कर आकारणी पुस्तकात सुधारणा करण्याचे तरतुदीप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र व्यक्ती म्हणून **श्री. मनोज दयालदास गोपलानी** अशी नोंद करण्यात आली आहे.

**करपात्र बाबींचा क्षेत्रफळाचा तपशिल पुढीलप्रमाणे**

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|
| RCC | Owner | Residential | 0 | 04-01-86 | 672 | 672 |

**विषयांकिंत मिळकतींकरीता खालील प्रमाणे नांव हस्तांतरण करण्यात आलेले आहे.**

**मुद्दा क्र. (१ )** जा.क्र./उमपा/करवि/यु.२/१९९/१० दि. २७/०७/२०१० रोजी नाव हस्तांतरण आदेश पारीत करण्यात आला असून महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत मालमत्ता कर भरण्यास प्रथमत: पात्र व्यक्ती म्हणून **श्री. मनोज दयालदास गोपलानी** अशी नोंद करण्यात आली आहे.

**मुद्दा क्र.** (२) तद्नंतर **श्री. कुमार तिरथदास बुलचंदानी ,** पत्ता - राम और शाम सीएचएस, फ्लाट क्र. ९, २ रा माळा, सेवा निकेतन हॉस्पिटल जवळ, उल्हासनगर - ३ यांनी दि. २३/०२/२०२४ रोजी हरकत दाखल केलेली आहे.

**मुद्दा क्र. (३)** त्याअनुषंगाने **श्री. कुमार तिरथदास बुलचंदानी व श्री. मनोज दयालदास गोपलानी** यांना सुनावणीस हजर राहणेबाबत सुनावणीचा दिवस, वेळ व ठिकाण निर्दिष्ट करणारी लेखी नोटीस दि. २९/०२/२०२४ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. परंतु श्री. मनोज दयालदास गोपलानी हे **आउट ऑफ स्टेशन (वाहेरगावी)** असल्यामुळे सदर सुनावणी रद्द करण्यात आली होती. तसेच दि. ०५/०३/२०२४ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. परंतु सदर सुनावणी काही प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात आली आहे.

त्यानंतर पुन्हा दि. ०६/०३/२०२४ रोजी संध्याकाळी ठिक ०५:०० वाजता उप-आयुक्त (कर) यांचे दालनात सुनावणी ठेवण्यात आली होती.

सदर सुनावणी दरम्यान अर्जदार - **श्री. कुमार तिरथदास बुलचंदानी व गैर अर्जदार - श्री. मनोज दयालदास गोपलानी** हे दोन्ही उपस्थित होते.

तसेच **श्री. कुमार तिरथदास बुलचंदानी यांनी** दिनांक ०६/०३/२०२४ रोजी सुनावणी दरम्यान संबंधीत मालमत्ता क्र. ११बीआय०१५१६६३०० (११/००८४५) अन्वये राम और शाम को-ऑप.हौसिंग सोसायटी लिमिटेडचे दिनांक ०१/१२/२०२२ रोजीचे पत्र सादर केलेले आहे.

तसेच **श्री. मनोज दयालदास गोपलानी यांनी** दिनांक ०६/०३/२०२४ रोजी सुनावणी दरम्यान संबंधीत मालमत्ता क्र. ११बीआय०१५१६६३०० (११/००८४५) अन्वये मा. सहदुय्यम निबंधक उल्हासनगर १ यांच्याकडील नोंदणीकृत केलेले घोषणापत्रची प्रत सादर केलेली आहे.

विषयांकित प्रकरणी संबंधीत कर निरीक्षक यांनी दिनांक ११/०३/२०२४ रोजी संदर्भित मिळकतीची प्रत्यक्ष पाहणी केली असून कर निरीक्षकाचा अहवाल पुढीलप्रमाणे सादर केला आहे.

(१) सद्यस्थितीत मालमत्ता क्र. ११बीआय०१५१६६३०० (११/००८४५) पत्ता - रामशाम सोसायटी, फ्लाट क्र. ९, उल्हासनगर - २ अन्वये मिळकतीचा **तावा श्री. कुमार तिरथदास बुलचंदानी** यांचेकडे दिसुन येत आहे.

(२) मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर देण्यास प्रथमत:पात्र व्यक्तीचे नावाची नोंद करण्यात येते. सदर नोंदीचा मालकी हक्काशी काहीही संबंध नाही. सदर नोंद अर्जदार यांनी सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे करण्यात येते. परंतु सदरची कागदपत्र खरी किंवा खोटे याची पडताळणी करणे मनपा कार्यक्षेत्रात येत नाही.

तरी उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत मालमत्ता क्र. ११बीआय०१५१६६३०० (११/००८४५) करीता मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र व्यक्ती म्हणून करण्यात आलेली **दादनबाई तिरथदास** ही नोंद कायम करणेबाबत शिफारस करण्यात येत आहे.

श्री. कुमार तिरथदास बुलचंदानी यांनी दाखल केलेली हरकत, संबंधीत कर निरीक्षक यांनी सादर केलेला कार्यालयीन अहवाल पाहता विषयाकिंत प्रकरणी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) आक्षेप मान्य करण्यात येत आहे.

२) उक्त बाबी विचारात घेता उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. ११बीआय०१५१६६३०० (११/००८४५) करीता मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र व्यक्ती म्हणून करण्यात आलेली **दादनबाई** तिरथदास ही नोंद कायम ठेवण्यात येत आहे.

३) उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत नावाची नोंद करणेकरीता जागेच्या मालकी हक्कासंदर्भात संबंधितांनी समक्ष प्राधिका-याकडे अर्ज करून कोर्टाकडील आदेश प्राप्त करून घ्यावेत तद्नंतर पुढील कारवाई करण्यात येईल.

उल्हासनगर महानगरपालिका

(प्रियंका राजपुत)
उप-आयुक्त (कर)
उल्हासनगर महानगरपालिका

प्रति,
मे. कोल्ब्रो ग्रुप नागपुर, यांना योग्य त्या कार्यवासाठी
प्रत -
१) **श्री.** कुमार तिरथ**दास बुलचंदानी , पत्ता** - राम और शाम सीएचएस, फ्लाट क्र. ९, २ रा माळा, सेवा निकेतन हॉस्पिटल जवळ, उल्हासनगर - ३

12/3/24

२) **श्री.** मनोज दयाल**दास गोपलानी, पत्ता** - बॅरेक क्र. १२५, रुम क्र. ८, उल्हासनगर - १

2937
12:00 AM

1244
13/3/24
जावक लिपिक
उल्हासनगर महानगर पालिका